# ६. तृतीयक आर्थिक क्रिया

## जरा विचार करा.

**खालील उतारा वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**

वेगवेगळी पार्श्वभूमी असलेले तीन मित्र आहेत. त्यांनी एकाच कॉलेजमधून पदवी प्राप्त केली आणि त्यांनी नवीन उद्योग स्थापन करण्याचे ठरवले.

रोहित हा शेतकऱ्याचा मुलगा आहे. त्याने कला शाखेतून पदवी प्राप्त केली आहे. तो त्याच्या वडिलांचा शेतीचा व्यवसाय, पण वेगळ्या पद्धतीने करण्याचा विचार करीत होता. त्याला वाटत होते की, त्याच्या दोन एकर शेतीतून निर्यातक्षम उत्पादने घ्यावीत.

सेजल ही एका उद्योगपतीची मुलगी आहे. त्यांचा घाऊक पद्धतीने बेकरी उत्पादने तयार करून विक्रीचा व्यवसाय आहे. तिने शास्त्र शाखेतून पदवी प्राप्त केली आहे. तिला जलद विक्री होणाऱ्या वस्तूंशी (FMCG) निगडित उद्योजिका बनायचे आहे.

आसिफ हा छोट्या हॉटेल व्यावसायिकाचा मुलगा आहे. त्याने कार्यक्रम व्यवस्थापनाची पदवी घेतली आहे. त्याला त्याची स्वतःची कार्यक्रम व्यवस्थापनाची कंपनी स्थापन करावयाची आहे.

चांगल्या गुणांनी पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी ठरवले की, एकमेकांना मदत करत स्वतःची कारकिर्द सुरू करायची. रोहित, सेजल आणि आसिफ व्यवसाय कसा सुरू करायचा याबद्दल माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करतात. व्यवसायांविषयी जास्तीतजास्त माहिती मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. प्रथम योजना तयार करून मग उद्योगाची स्थापना करायची, असे ते ठरवतात. माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेमध्ये त्यांना व्यवसायासंबंधी माहिती मिळते.

रोहितला आपल्या शेतीमध्ये मोठे बदल करावे लागतील हे त्याला कळले. निर्यातक्षम गुणवत्तेची लिली, ऑर्किडसारखी फुले आणि किवी, ड्रॅगनफ्रुटसारखी फळे पिकवण्यासाठी वातावरणात विशिष्ट आर्द्रता आणि तापमानकक्षा राखावी लागणार होती. मृदेचा सामू (PH) टिकविण्यासाठी विशेष खत वापरण्याची गरज होती. त्याला हेदेखील समजले होते की, त्यासाठी तालुका कृषी अधिकाऱ्यांची मदत घ्यावी लागेल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे निर्यातीवर आधारित व्यवसाय सुरू करण्यासाठी परवाना काढावा लागतो. परदेशी व्यवहार करण्यासाठी बँकेत एक खाते उघडावे लागते. तसेच याही गोष्टीची माहिती मिळाली की निर्यातक्षम गुणवत्तेच्या उत्पादनासाठी रोपे कोठे मिळतात. आखाती राष्ट्रांमध्ये या फुलांना चांगली मागणी असून त्यांपासून आर्थिक परतावाही चांगला मिळतो. हे देश जवळचे असल्याने विमानाने काही तासांतच माल या देशांना पोहोचता करता येतो. त्यामुळे त्यांचा ताजेपणा, मालाची गुणवत्ताही चांगली राखता येते. आपला उद्योग थेट त्या देशात उभारण्यासाठी तेथील काही विक्रेत्यांना भेटी देण्याचे रोहितने ठरविले.

सेजलच्या हे लक्षात आले की टूथपेस्ट ही लोकांच्या नित्य गरजेची वस्तू आहे. तिच्या शास्त्र शाखेच्या पार्श्वभूमीवर दंतआरोग्य चांगले ठेवण्याचे प्रगत सूत्र तिने ठरवले. त्यासाठी तिने औषधनिर्माण उद्योगात काम करत असलेल्या चुलत भावाची मदत घेतली. याशिवाय खालील अनेक गोष्टींची उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यकता होती, याची तिला माहिती मिळाली.

- उद्योगासाठी लागणारी यंत्रसामग्री विकत घेणे आणि कामगार नेमणे.
- उद्योग स्थापण्यासाठी जागा.
- शासनाच्या सक्षम यंत्रणेकडून उद्योगासाठीचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच विविध परवानग्या- जसे अग्निशमन कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र इत्यादी.
- तयार केलेली टूथपेस्ट भरण्यासाठीच्या ट्यूब व वेष्टनासाठी कागदी डब्बे तयार करून देणारे उद्योग.
- उत्पादनाच्या जाहिरातींसाठी जाहिरात संस्थेची नेमणूक.

खरे तर एवढे मोठे पाऊल उचलताना सेजल थोडी साशंक होती. कारण या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर भांडवल व जागेची गरज होती. शासनाच्या 'स्टार्ट अप' योजनेअंतर्गत तिला कमी व्याजदराचे कर्ज मिळू शकते, हे सेजलला कळल्यावर तिला थोडा हुरूप आला. सेजलच्या वडिलांनी तिचा जमिनीच्या उपलब्धतेचा प्रश्न सोडवला. त्यांनी शहराच्या एका टोकाला असलेली त्यांच्या मालकीची जमीन सेजलला देऊ केली. त्यात त्यांनी उद्योगासाठी लागणाऱ्या पायाभूत सोयी जसे, वीज आणि पाणी जोडणी, ठेकेदाराकडून इमारत बांधून घेण्याचे ठरवले. ही तयार जमीन (प्लॉट) त्यांनी सेजलला भाडेकरारावर देण्याचे ठरवले.

आसिफला त्याच्या व्यवसायाकरता प्रामुख्याने सेवा व मनुष्यबळाची आवश्यकता आहे हे लक्षात आले. या व्यवसायासाठी मनुष्यबळ भाड्याने काही काळासाठी सहज उपलब्ध होते हेही त्याला कळले. जसे खानपान सेवा, वाजंत्रीवाले, फुलवाले, ध्वनिवर्धक इत्यादी कामासाठीचे मनुष्यबळ. प्रत्येक कार्यक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या विविध सक्षम यंत्रणांकडून घ्याव्या लागतात. त्या कशा घ्यायच्या याची माहिती त्याने करून घेतली. त्याचा व्यवसाय सुरू करण्यासाठी बाजारपेठेत एखादे कार्यालय उघडणे योग्य होईल असे त्याच्या लक्षात आले. त्याच्या स्टार्ट अपसाठी एक माहितीपत्रक व स्वतःचे व्हिजिटिंग कार्ड त्याने तयार करून घेतले.

वर्षभराच्या नियोजनानंतर तिन्ही मित्रांनी आपापले व्यवसाय सुरू केले. त्यांनी त्यांचे व्यवसाय स्वतःच निवडलेले असल्याने ते करण्यास त्यांना आनंद वाटत होता. त्यांचे व्यवसाय आता त्यांच्या विशेष आवडीचे बनले आहेत.

१) विविध सक्षम यंत्रणा म्हणजे काय?

२) गोष्टीतील तीनही मुले कोणत्या प्रकारचे आर्थिक व्यवसाय निवडणार आहेत?

३) प्रत्येकाला त्याचा आर्थिक व्यवसाय करताना इतर कोणत्या आर्थिक व्यवसायांशी संबंध येईल?

४) वरील परिच्छेदात जेवढ्या आर्थिक क्रिया आल्या आहेत त्यांचे आर्थिक प्रकारांनुसार वर्गीकरण करा.

### भौगोलिक स्पष्टीकरण

या गोष्टीचे वाचन करताना तुम्हांला अनेक मानवी व्यवसायांचा उल्लेख आल्याचे लक्षात आले असेल. या सर्व व्यवसायांना मानवाच्या आर्थिक क्रिया म्हणून अभ्यासले जाते. यातील काही व्यवसाय पूर्णतः निसर्गावर आधारित असतात. या सगळ्या मानवाच्या प्राथमिक आर्थिक क्रिया आहेत. या व्यवसायांतून नैसर्गिक साधनसंपत्ती मिळवली जाते.

या व्यवसायातील काही उत्पादने मानव थेट वापरू शकत नाही किंवा ती उत्पादने जास्त टिकाऊ किंवा मूल्यवर्धित करून वापरणे योग्य असते. अशा वेळी या उत्पादनांवर प्रक्रिया केली जाते. यातून नवीन व वेगळी उत्पादने उपलब्ध होतात, जी वापरण्यास योग्य, जास्त टिकाऊ व जास्त किमतीत विकता येतात. ही उत्पादने प्रक्रिया उद्योगांद्वारे द्वितीयक व्यवसायात समाविष्ट होतात. द्वितीयक व्यवसाय प्रामुख्याने प्राथमिक व्यवसायातून प्राप्त झालेल्या उत्पादनांवर अवलंबून असतात.

प्राथमिक व द्वितीयक व्यवसाय यांच्यातील आदान-प्रदान, यांच्यातील दुवा, या दोघांना पूरक असे विविध व्यवसायही असतात. या सेवांमध्ये मालाची खरेदी-विक्री, वाहतूक, दळणवळण, मालाची चढ-उतार, तारण व कर्जरोखे संस्था, विपणन, आयात-निर्यात व्यवस्था इत्यादींचा समावेश होतो. लोकोपयोगी सेवांचाही समावेश या व्यवसायात होतो. उदा. धारवाला, भाजीविक्रेता, दुकानदार, प्रवासी वाहतूक, टपालसेवा इत्यादी. या सर्व व्यवसायांना तृतीयक आर्थिक व्यवसाय म्हणतात. आकृती ६.१ पाहा.


### जरा डोके चालवा.

- तृतीयक व्यवसायात केवळ सेवा येतात का?
- तृतीयक व्यवसायात उत्पादने येतात का? वर्गात चर्चा करून त्याची यादी करा.

### सांगा पाहू?

आकृती ६.१ मधील तक्त्यात तृतीयक व्यवसायात समाविष्ट होणाऱ्या अनेक आर्थिक क्रिया दिल्या आहेत. या आर्थिक क्रियांचे वर्गीकरण खालील दोन गटांत करा.

- भौगोलिक घटकांवर अवलंबून असलेल्या
- भौगोलिक घटकांवर अवलंबून नसलेल्या



आकृती ६.१

### सांगा पाहू ?

- तुमच्या दैनंदिन जीवनात तुम्ही अनेक गोष्टी वापरता त्यांची यादी तयार करा.
- तुम्ही केलेल्या यादीचे व्यावसायिक स्रोतानुसार प्राथमिक, द्वितीयक, तृतीयक या व्यवसायांमध्ये वर्गीकरण करा. उदा. मीठ – प्राथमिक
- तुमच्या यादीत वरील तिन्ही प्रकारच्या व्यवसायांत न बसणारी नावे आहेत का ? कोणती ?

### भौगोलिक स्पष्टीकरण

तृतीयक आर्थिक व्यवसायात प्राथमिक व्यवसायांप्रमाणे निसर्गातून काहीही घेतले जात नाही. या व्यवसायात द्वितीयक व्यवसायांप्रमाणे नवीन उत्पादनेही निर्मिली जात नाहीत. या व्यवसायात केवळ सेवा दिली जाते व तिच्या बदल्यात मोबदला घेतला जातो. म्हणून त्या व्यवसायांना सेवा व्यवसाय म्हणतात.

या सेवा व्यवसायांचे वितरण हे अनेक भौगोलिक घटकांनी प्रेरित झालेले असते. तुम्ही केलेल्या यादीमध्ये निसर्गावर अवलंबून नसलेल्या आर्थिक क्रिया फारच थोड्या असतील असे तुमच्या लक्षात येईल. हवामान, भूरचना, समुद्र सान्निध्य अथवा खंडांतर्गतता इत्यादी भौगोलिक घटकांचा परिणाम तृतीयक आर्थिक व्यवसायांवर होत असतो.

नाशवंत कच्चा माल किती काळ टिकेल यावर द्वितीयक व्यवसाय तर अवलंबून असतातच; परंतु या मालाची वाहतूक कोणत्या मार्गाने करायची हेसुद्धा भौगोलिक घटकांमुळे ठरते. उदा. शेतीतून पिकवलेल्या द्राक्षासारख्या उत्पादनाची परदेशी वाहतूक विमान मार्गाने करणे फायदेशीर असते, तर कापूस जलमार्गाने पाठवणे किफायतशीर ठरेल.

जगभरात सर्व मानवी वस्त्या या भौगोलिक घटकांच्या अनुकूलतेनुसार वसलेल्या आहेत. बाजारपेठा मग त्या किरकोळ असो वा घाऊक, नेहमीच या वस्त्यांमध्ये किंवा वस्त्यांजवळ निर्माण होतात. एखादा द्वितीयक आर्थिक व्यवसाय वस्तीपासून दूर स्थापित होऊ शकतो. परंतु बाजारपेठांचे तसे होत नाही. त्या नेहमीच वस्त्यांजवळ आढळतात.

बंदर, गोदी या ठिकाणी मालाची चढ-उतार होत असते. ह्या बंदर किंवा गोदी यांचे स्थान 'गुगल सर्च'च्या साहाय्याने शोधण्याचा प्रयत्न करा (उदा. घोडबंदर, कोची पोर्ट ट्रस्ट, मुंबई पोर्ट ट्रस्ट, दिल्ली इंटरनॅशनल कार्गो टर्मिनल.) तुमच्या असे लक्षात येईल की ही स्थाने एकतर जल किंवा हवाई मार्गांजवळ आढळतात.

वरील काही उदाहरणांवरून हे स्पष्ट होते की, मानवाचे तृतीयक आर्थिक व्यवसायही भौगोलिक घटकांमुळे प्रेरित होत असतात. वाहतूक व्यवस्था हे आणखीन एक उदाहरण आहे. ही व्यवस्था वर्तमान काळात अत्यंत प्रगत तंत्राद्वारा विकसित होत आहे. परंतु अनेक ठिकाणी ही व्यवस्था भौगोलिक घटकांमुळे बाधित होते किंवा कोलमडून पडते.


**वाहतूक :**

वाहतूक ही अशी सेवा किंवा सुविधा आहे, ज्याद्वारे माणसे, वस्तू आणि उत्पादित माल इत्यादी प्रत्यक्षपणे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी नेले जातात. कोणत्याही देशाच्या विकासात वाहतूक व्यवस्थेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. तृतीयक आर्थिक क्रियांमधील वाहतूक व्यवसाय हा पायाभूत घटक आहे. सर्व आर्थिक क्रियांचा विकास वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून असतो.

### नकाशाशी मैत्री!

**आकृती ६.२ पाहून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. नकाशात कोणकोणते वाहतूक मार्ग दाखवले आहेत ?
२. सर्वसाधारणतः कोणत्या खंडांदरम्यान वाहतुकीचा ओघ जास्त आहे ?
३. जलमार्गासाठी कोणकोणत्या कालव्यांचा वापर केला जातो ? या कालव्यांचा उद्देश कोणता ?
४. हवाई मार्गामुळे भारतातील कोणती दोन प्रमुख शहरे इतर राष्ट्रांशी जोडली गेली आहेत ?
५. हवाई मार्गांचा कमी वापर होत असलेले दोन खंड कोणते ? असे का ?
६. लोहमार्गाचा कमी वापर होत असलेले दोन खंड कोणते ?
७. कोणता लोहमार्ग दोन खंडांना जोडतो ?
८. जगातील सर्व खंड हे ऑस्ट्रेलियाच्या उत्तरेला आहेत. परंतु वाहतुकीचे जाळे ऑस्ट्रेलियामध्ये दक्षिणेला आहे असे का ?
९. खंडांतर्गत सलग लोहमार्ग कोणत्या खंडात आढळत नाही ? त्याचे कारण काय ?



जग – प्रमुख वाहतूक मार्ग
आर्क्टिक महासागर
पॅसिफिक महासागर
अटलांटिक महासागर
हिंदी महासागर
दक्षिण महासागर
उत्तर अमेरिका
दक्षिण अमेरिका
युरोप
आफ्रिका
ऑस्ट्रेलिया
अंटार्क्टिका
व्हँकुव्हर
सॅनफ्रान्सिस्को
लॉस एंजेलिस
मॉन्ट्रियल
हॅलिफाक्स
बोस्टन
न्यूयॉर्क
वॉशिंग्टन डीसी
न्यू ऑर्लिन्स
हॉस्टन
पनामा
काली
सुअपि
रिओ दी जनेरीओ
ब्युयानोआरिज
वलपारायसो
लंडन
अँटवर्प
हम्बुर्ग
किल
मॉस्को
रोम
जिब्राल्टर
इस्तंबूल
सुएझ
दुबई
कराची
दिल्ली
मुंबई
कोची
कोलंबो
बँकॉक
सिंगापूर
क्लँग
हाँगकाँग
ओम्सक
नोव्होसिबिस्क
उलान–उडे
खंबारोवस्क
व्लादिवोस्टॉक
बिजींग
तिमजी
ग्रँड कॅनल
सेऊल
नागोया
ओसाका
शांघाय
टोकियो
योकोहामा
जोहान्सबर्ग
केप ऑफ गुड होप
पर्थ
ॲडिलेड
ब्रिस्बेन
सिडनी
मेलबर्न
ऑकलंड
आ
शि
या
६०° उ.
३०° उ.
२३° ३०' उ.
०°
२३° ३०' द.
३०° द.
६०° द.
सूची
कालवा
बंदर
विमानतळ
लोहमार्ग स्थानक
जलमार्ग
हवाईमार्ग
लोहमार्ग
उ.
० ५००० किमी.


आकृती ६.२

### भौगोलिक स्पष्टीकरण

वाहतूक प्रणालीत वाहतुकीची साधने हा अत्यावश्यक घटक आहे. या साधनांद्वारे प्रवासी, माल किंवा दोघांचीही वाहतूक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होत असते.

वाहतुकीच्या साधनांचे सर्वसाधारण वर्गीकरण तीन प्रकारांत करता येते. हे वर्गीकरण ही साधने कोणत्या प्रकारचा मार्ग वापरतात, त्यावर अवलंबून असते. जसे, भू-मार्ग, जलमार्ग, हवाईमार्ग. प्रत्येक मार्गाची वैशिष्ट्ये व गरजा वेगवेगळ्या असतात. प्रत्येक मार्गावर मागणीनुसार ठरावीक मालाची आणि प्रवाशांची वाहतूक होत असते. यामुळे जगातील वेगवेगळ्या भागांत प्रत्येक मार्गाचा विकास आणि वापर यांमध्ये मोठा फरक दिसतो.

भौगोलिक घटकांचा वाहतुकीवर मोठा परिणाम होतो. भूरचना, स्थान आणि हवामान हे तीन त्यापैकी प्रभावशाली भौगोलिक घटक आहेत. ज्या परिसरात भूरचना फार उंचसखल नसते अशा ठिकाणी रस्ते, लोहमार्ग व नळमार्ग विकसित करणे सोपे असते. वनाच्छादित प्रदेशांत, डोंगराळ व पर्वतीय प्रदेशांत मात्र असे मार्ग विकसित करताना अडथळे येतात. उदा. आफ्रिका व दक्षिण अमेरिका खंडांतील घनदाट वनांच्या प्रदेशात व वाळवंटी प्रदेशात लांब अंतराचे रस्ते, लोहमार्ग इत्यादी विकसित करताना अडचणी येतात.

बंदरे आणि गोदींसाठी किनारी प्रदेश सुयोग्य असतात. विशेषतः दंतूर किनारे. त्यामुळे प्रत्येक किनारा हा या व्यवसायासाठी किंवा सुविधेसाठी योग्य असेलच असे नाही.

वर्तमानकाळात तंत्रज्ञानात झालेल्या बदलांमुळे हवाई वाहतुकीच्या वापरात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आढळते. असे असले तरीही अजूनसुद्धा जगभरातील व्यापार सागरी मार्गाद्वारेच चालतो. सागरी अंतर कमी करण्याच्या उद्देशाने कालवे निर्माण केले गेले. सुएझ कालवा आणि पनामा कालवा यांच्यामुळे जगभरातील सागरी मार्गांमध्ये आमूलाग्र बदल झाले, सुएझ कालव्यामुळे आशिया, आफ्रिका आणि युरोप खंड भूमध्य समुद्राद्वारे जोडले गेले आहेत. पनामा कालव्यामुळे पॅसिफिक व अटलांटिक महासागर जोडले गेले आहेत.

हवाई मार्गासाठी पोषक हवामान, आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास व विमानतळ व गोदी यांसाठी मैदानी प्रदेशांची आवश्यकता असते. सततचे धुके किंवा धुरके पर्वतशिखरांनी व्याप्त प्रदेश हवाई वाहतुकीस अडथळ्याचे ठरतात.

## व्यापार :

### करून पहा.

**खालील अ, आ, इ या परिस्थिती विचारात घ्या व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) 'क' आणि 'ख' हे दोन देश आहेत. 'क' हा देश २०० मजुरांना कामावर ठेवून ५०० टन गव्हाचे उत्पादन करतो. तर 'ख' हा देश ३०० मजुरांना कामावर ठेवून १००० टन गव्हाचे उत्पादन करतो.

आ) 'ग' ३०० कि.ग्रॅ. चहाचे उत्पादन घेतो आणि 'म' ५०० कि.ग्रॅ. कॉफीचे उत्पादन घेतो. 'ग' हा देश कॉफीचे उत्पादन घेत नाही आणि 'म' हा देश चहाचे उत्पादन घेत नाही.

इ) 'च' ह्या देशात जल अभियांत्रिकी आणि कृषी क्षेत्रात कौशल्य आहे तर 'छ' या देशाचे मेट्रो निर्मितीमध्ये कौशल्य आहे.

१. 'अ' सारख्या परिस्थितीत 'क' आणि 'ख' या दोन देशांदरम्यान व्यापार होईल का?

२. 'आ' सारख्या परिस्थितीत 'ग' आणि 'म' या दोन देशांदरम्यान व्यापार होईल का?

३. जर 'अ' सारख्या परिस्थितीत 'क' आणि 'ख' या दोन देशांदरम्यान व्यापार होत असेल, तर दोन देशांच्या अर्थव्यवस्थेबद्दल तुम्हांस काय लक्षात येते?

४. जर 'आ' सारख्या परिस्थितीत 'ग' आणि 'म' या दोन देशांदरम्यान व्यापार होत असेल तर दोन देशांतील हवामानाबद्दल काय सांगता येईल?

५. जर 'इ' सारख्या परिस्थितीत दोन देशांदरम्यान व्यापार होत असेल तर ते तुम्हांस देशांच्या मानवी साधनसंपत्तीबद्दल काय सूचित करते?

६. दोन देशांमधील व्यापारावर परिणाम करणाऱ्या घटकांची यादी तयार करा.

### भौगोलिक स्पष्टीकरण

व्यापार म्हणजे दोन किंवा अधिक देशांमध्ये वस्तू आणि सेवांची ऐच्छिक देवाणघेवाण होय. आदिम समाजाकडून केला जाणारा वस्तू विनिमय हा व्यापाराचा प्रारंभिक प्रकार होता. त्यात फक्त वस्तूंची देवाणघेवाण होत होती. आज वस्तू आणि सेवांचाही व्यापार होतो. द्विराष्ट्रीय किंवा बहुराष्ट्रीय व्यापार हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रमुख प्रकार आहेत. व्यापार हा अन्तर्देशीय होऊ शकतो. व्यापारावर अनेक घटकांचा परिणाम

होऊ शकतो. आंतरराष्ट्रीय व्यापार हा मानवी संसाधने आणि उत्पादनातील विशेषत्वाचा परिणाम आहे.

व्यापारातील भागीदारांना जर परस्पर फायदा होऊ शकत असेल तरच व्यापार होऊ शकतो. तसेच जेव्हा दोन्ही देशांमध्ये उत्पादन घेण्यापेक्षा एकाच ठिकाणी उत्पादन करण्याचा तौलनिक फायदा लक्षात आल्यावर देखील दोन देशांत व्यापार होऊ शकतो. आता असा प्रश्न पडतो की, ही तर सरळ सरळ अर्थशास्त्राची बाब आहे. याची चर्चा भूगोलात कशाला? पण खरेतर या आर्थिक क्रियेचे मूळच भूगोलात आहे. पुढील विवेचनात तुमच्या ते लक्षात येईल.

**विविध भौगोलिक घटक खालीलप्रमाणे –**

- **नैसर्गिक संसाधनांच्या वितरणामधील फरक –** आत्तापर्यंत आपण अनेक संबोध भूगोलातून अभ्यासले आहेत. त्यातील नैसर्गिक प्रदेश हा संबोध हे स्पष्ट करतो की, हे प्रदेश एकमेकांपेक्षा भिन्न आहेत. साहजिकच या प्रदेशांतील निसर्गाकडून उपलब्ध होणारी साधनसंपत्तीही वेगवेगळी असणार, म्हणजेच जे एका प्रदेशात असेल ते दुसऱ्या ठिकाणी असेलच असे नाही. याचा अर्थ असा की, काही घटक एका ठिकाणी मोठ्या प्रमाणावर असतील तर दुसऱ्या ठिकाणी त्याची कमतरता असू शकते.

  मृदा, खनिजे, वने, भूमी, जल आणि मानवी संसाधने अशा सर्व संसाधनांचे वितरण असमान असते. मृदा संसाधन ज्या देशात विपुल व उच्च प्रतीचे असते तेथे कृषीसंबंधी व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. असे देश हे अन्नधान्य व इतर पिकांचे निर्यातदार बनू शकतात. याउलट ज्या देशात मोठ्या प्रमाणावर शेती केली जात नाही अशा देशांना अन्नधान्ये आयात करावी लागतात. उदा. आखाती देश खनिज तेल निर्यात करतात. या देशांत हे खनिज विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. त्या बदल्यात ते अन्नधान्य आयात करतात.

- **हवामान –** हवामानाचा परिणाम प्रदेशातील वनस्पती व प्राणी यांच्यावर होत असतो. देशातील उत्पादनाचे प्रकार हेदेखील हवामानावर अवलंबून असतात. उदा. वर्षातील बराच काळ हिमाच्छादन असलेले देश प्रामुख्याने मांस व लोकर उत्पादनाची निर्यात करतात. तर उष्णकटिबंधीय देश केळी, तांदूळ, कोको, चहा यांचे उत्पादन घेतात व ही उत्पादने निर्यात करतात. उदा. श्रीलंका हा चहा निर्यात करणारा एक प्रमुख देश आहे. स्वस्त मनुष्यबळ, पूरक हवामान, उताराची जमीन, पाण्याचा निचरा होणारी मृदा या भौगोलिक घटकांमुळे येथे चहाचे मळे मोठ्या प्रमाणावर आहेत. येथील उत्पादन देशातील गरज भागवूनही मोठ्या प्रमाणावर उरते. हा चहा त्या देशासाठी अतिरिक्त असतो. युनायटेड किंगडम या देशात चहाचे मळे नाहीत. परंतु मागणी मात्र मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे श्रीलंका, भारत यांच्याकडून यूके हा देश चहा विकत घेतो.

- **लोकसंख्या –** लोकसंख्येचे प्रमाण, वितरण व वैविध्य यांमध्ये वेगवेगळ्या देशांत फरक दिसून येतो. त्यामुळे विविध उत्पादने देशनिहाय घेतली जातात व व्यापार होतो. तसेच व्यापाराच्या प्रमाणावरही त्याचा परिणाम होतो. दाट लोकवस्ती असलेल्या देशांना स्वतःच्या लोकसंख्येकरिता अन्नपुरवठ्याबाबत चिंता करावी लागते. विविध वस्तू आणि सेवांची मागणी ही राहणीमानाच्या दर्जावर अवलंबून असते. कमी लोकसंख्या असणारे देश व्यापारावर जास्त अवलंबून असतात . कारण कमी लोकसंख्येमुळे वस्तूंच्या उत्पादन कार्यातदेखील कमी मनुष्यबळ गुंतलेले असते. आशिया खंडातील भारतासह अनेक देशांतील मनुष्यबळ हे आजच्या स्थितीत उत्तम माहिती तंत्रज्ञ म्हणून जगभर प्रसिद्ध आहे. या देशांमधील शिक्षण प्रणाली, गणिती ज्ञान, तंत्रज्ञान वापरायचे कौशल्य यांमुळे हे साध्य झाले आहे. येथे भौगोलिक घटकांचा थेट परिणाम नसला तरीही एकाच भौगोलिक प्रदेशातील हे मनुष्यबळ आहे हे लक्षात घेण्याजोगे आहे.

- **संस्कृती –** जगातील काही प्रदेश त्यांची उत्पादने, विशिष्ट कला आणि हस्तकला यांसाठी ओळखले जातात. त्याचे जगभरात मूल्य अधिक असते. उदा. चिनी मातीची उत्पादने, इराणी गालिचे, इंडोनेशियातील बाटिक प्रिंट, भारतातील काश्मिरी शाल आणि रेशीम यांना जगभर मोठी मागणी आहे. यामुळे व्यापारास चालना मिळते.

- **आर्थिक खर्च –** हा उत्पादनातील मुख्य घटक आहे. काही उत्पादनांची देशात निर्मिती करण्यापेक्षा बाहेरून आयात करणे स्वस्त होत असल्यासही व्यापार सुरू होतो. उदा. एखाद्या देशात चहाच्या उत्पादनासाठी हवामान आणि प्राकृतिक रचना अनुकूल नसेल तर त्याला चहा उत्पादक देशांकडून चहा आयात करणे सोयीस्कर जाईल.

- **निपुणता** – काही देशांमध्ये विशेष वस्तू निर्मिती व सेवा आहेत. उदा. इस्रायलने कोरडवाहू शेती किंवा शेती अभियांत्रिकीमध्ये स्वतःला विकसित केले आहे. ते आपल्या सेवा वाळवंटी भागात शेती करू इच्छिणाऱ्या देशांना निर्यात करतात. तसेच अशा काही विशेष वस्तू व सेवांची आंतरराष्ट्रीय मागणी असते आणि त्यामुळे देशांदरम्यान व्यापार होऊ शकतो.

### सांगा पाहू?


- बुद्धिमत्ता, शारीरिक मेहनत या गोष्टींची आयात–निर्यात होऊ शकते का?
- होत असल्यास काही उदाहरणांची वर्गात चर्चा करा.

- **शासकीय धोरणे** – आंतरराष्ट्रीय व्यापार चालणे किंवा बंद होणे हे शासन धोरणावरही अवलंबून असते. शासनाचे मुक्त व्यापार धोरण नागरिकांना दुसऱ्या देशात खरेदी किंवा विक्री करण्यापासून प्रतिबंधित करणार नाही. उदा. दुसऱ्या देशाशी चांगले संबंध राखण्यासाठी एखादा देश त्यांच्या बरोबर व्यापार करू शकतो.

**व्यापारातील वाहतुकीचे महत्त्व** – वाहतूक ही एक तृतीयक क्रिया असून ती व्यापार करण्यासाठी फार महत्त्वाची आहे. जलवाहतूक, बंदर आणि हवाई वाहतुकीचे महत्त्व व्यापारामध्ये अनन्यसाधारण आहे.

### करून पहा.

आकृती ६.३ मध्ये सागर वाहतुकीद्वारे सन १९८० ते २०१० पर्यंत झालेला व्यापार दर्शविला आहे. या आलेखाचा वापर करून विवेचनात्मक टीप लिहा.




आकृती ६.३

### शोधा पाहू!

कुर्ग, युसमर्ग, सापुतारा, लाडघर, मरिना समुद्र किनारा, इस्तंबूल, मिलान ही ठिकाणे कशासाठी प्रसिद्ध आहेत ते शोधा. या ठिकाणांचा मुख्य आर्थिक व्यवसाय कोणता? या ठिकाणांचे स्थान (भौगोलिक) आणि आर्थिक व्यवसायाचा संबंध आहे का ते शोधा.

**पर्यटन :**

### करून पहा.

पुढील दोन तक्ते अभ्यासा आणि प्रश्नांची उत्तरे द्या :

| तक्ता १ : काही प्रदेशांच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात पर्यटनाचे थेट योगदान (%) | |
|---|---|
| मालदीव | ३८.९२ |
| ब्रिटिश वर्जिन बेटे | ३२.९६ |
| मकाऊ | २८.०१ |
| अरुबा | २७.६४ |
| सेशेल्स | २५.७३ |

| तक्ता २ : काही प्रदेशांतील पर्यटनामध्ये गुंतलेल्या लोकसंख्येची टक्केवारी | |
|---|---|
| अरुबा | २९.९१ |
| सेंट लुशिया | २७.२९ |
| बहामा | २६.४९ |
| मकाऊ | २६.४८ |
| सेशेल्स | २५.३५ |

(स्रोत: विश्व बँक (सन २०१८)

१) वरील तक्ते काय दर्शवितात?
२) दोन्ही तक्त्यांमधले देश सारखे आहेत का?
३) या देशांना जगाच्या नकाशावर दाखवा.
४) या देशांमध्ये पर्यटनाचे योगदान स्थूल राष्ट्रीय उत्पन्न व रोजगार यांत अधिक असण्याचे कारण काय असावे?
५) पर्यटनावर परिणाम करणाऱ्या घटकांसंबंधी निष्कर्षाचा एक परिच्छेद लिहा.

### भौगोलिक स्पष्टीकरण

पर्यटन हा एक महत्त्वाचा तृतीयक आर्थिक व्यवसाय आहे . गेल्या काही दशकांमध्ये पर्यटन व्यवसायात खूप वाढ झालेली आढळते. सद्य:स्थितीत, वाहतुकीच्या प्रगत साधनांमुळे आणि

पर्यटनासाठी लागणाऱ्या मूलभूत सुविधांमुळे या क्षेत्रात ही वाढ झालेली आढळते. तक्त्यात दिलेले देश नकाशा पुस्तिकेत पहा. या देशांचे स्थान आणि स्थिती पाहता हे लक्षात येईल की हे सगळे प्रदेश बेटांच्या स्वरूपात आहेत. त्यामुळे तेथील सम हवामान तसेच नैसर्गिक सौंदर्य, भूमी तसेच सामुद्रिक खेळांची उपलब्धता यांमुळे त्या ठिकाणी पर्यटन व्यवसाय विकसित झाला. त्यांच्या देशाच्या राष्ट्रीय स्थूल उत्पन्नात पर्यटनाचा वाटा सर्वात मोठा आहे. तसेच या देशांत पर्यटन व्यवसायात गुंतलेली लोकसंख्याही जास्त आहे.

एखाद्या ठिकाणी पर्यटन व्यवसाय वाढण्यासाठी पुढील भौगोलिक घटक महत्वाची भूमिका बजावतात. स्थान आणि स्थिती, हवामान, भू-रचना, उंची, जैवविविधता, सुगमता, पाण्याची उपलब्धता हे महत्वपूर्ण प्राकृतिक घटक आहेत, तर वाहतुकीच्या सोयी, राहण्याखाण्याच्या सोयी, सांस्कृतिक वैविध्य, शासकीय धोरणे आणि राजकीय परिस्थिती हे पर्यटनाच्या विकासावर परिणाम करणारे महत्वपूर्ण मानवी घटक आहेत.


### जरा डोके चालवा.

पर्यटनावर किमान अवलंबित्व असलेले देश तक्त्यात दिले आहेत. या देशांना नकाशावर शोधा. या देशांमध्ये पर्यटनाचा विकास न होण्यामागील भौगोलिक कारणे कोणती, ते स्पष्ट करा.

| देश | राष्ट्रीय स्थूल उत्पन्नात पर्यटन व्यवसायाचे योगदान (%) (२०१८) |
|---|---|
| प्रजासत्ताक लोकशाही कांगो | ०.६६ |
| पापुआ न्यू गिनी | ०.६६ |
| उझबेकिस्तान | ०.९३ |
| मोल्डोवा | ०.९६ |
| गॅबन | १.०२ |

## संदेशवहन :

### सांगा पाहू ?




आकृती ६.४ : कालमापी - संदेशवहनाची साधने

१. कालमापीत उल्लेखलेल्या बाबी कशाशी संबंधित आहेत ?
२. यांपैकी कोणती साधने तुमच्या माहितीची आहेत ?
३. यांपैकी कोणती साधने तुम्ही प्रत्यक्ष वापरता ?
४. वरीलपैकी कोणती साधने आता कालबाह्य झाली आहेत ?
५. ही साधने कालबाह्य होण्याची कारणे काय असावीत ?
६. या यादीत तुम्ही अजून भर घालू शकता का ?

### भौगोलिक स्पष्टीकरण

संदेशवहन ही एक प्रक्रिया आहे, ज्याद्वारे संदेशाचे आदान-प्रदान होते. सर्व सजीवांमध्ये ही प्रक्रिया होत असते. मानव संदेशाचे वहन वेगवेगळ्या प्रकारे करत असतो. जसे चित्रांची भाषा, चिन्हांची भाषा, बोलणे, सांकेतिक भाषेत लिहिणे, अंगविशेष, मुद्रा इत्यादी. यातील काही संदेशवहन समक्ष घडते, तर काही संदेश दूरवर पाठवून घडवले जाते. जसे आदिम काळात रंगीत धुराचा वापर करून आदिवासी जमाती एकमेकांना विविध संदेश पाठवत असत. वर्तमानकाळात आपण आपले संदेश लिखित अथवा तोंडी स्वरूपात दूरध्वनी, मोबाइल, इंटरनेट इत्यादींद्वारे पाठवत असतो.

सध्याच्या युगात संदेशवहन, माहिती संप्रेषण हे परवलीचे शब्द झाले आहेत. हे युगच माहितीचे युग म्हणून नावारूपास आले आहे. ज्याच्याकडे माहिती तो आघाडी घेणार. याचाच अर्थ ही माहिती मिळविण्यासाठी प्रत्येक जण, प्रत्येक देश सतत प्रयत्नशील असतो. उदा. कृत्रिम उपग्रहांचा वापर.

अवकाशात सोडलेले अगणित कृत्रिम उपग्रह अहोरात्र संदेशवहनाचे काम करतात. यातून पृथ्वीच्या विविध नैसर्गिक व मानवी घटकांबद्दल माहिती मिळविली जाते. उदा. रोजच्या हवेची स्थिती, आवर्त, पृथ्वीच्या गर्भातील हालचाली, खनिजसाठे शोधणे, एखाद्या ठिकाणाचे अक्षांश-रेखांश मिळवणे.

या सर्व संदेशवहनाचा उपयोग प्रादेशिक विकासासाठी आता मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. या तृतीयक व्यवसायाचा विस्तार आणि आवाका दिवसेंदिवस वाढत आहे.

## जरा डोके चालवा.

नकाशा हे संदेशवहनाचे साधन आहे का?

## सांगा पाहू?

भूगोल विषयाच्या इ.११ वी व इ. १२ वीच्या प्रात्यक्षिकांपैकी कोणती प्रात्यक्षिके तुम्ही कृत्रिम उपग्रहाच्या मदतीने संदेशवहनाद्वारे केली आहेत?

## पहा बरे जमते का?

खाली दिलेल्या माहितीसाठी योग्य आलेख काढा आणि या माहितीचा अर्थ सांगणारा परिच्छेद लिहा.

**तक्ता क्र.६.४ :** स्थूल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये विविध क्षेत्रांचे योगदान. (%)

| देश | प्राथमिक २०१८ | द्वितीयक २०१८ | तृतीयक २०१८ |
|---|---|---|---|
| डेन्मार्क | १.० | ३४.० | ६५.० |
| भारत | १४.० | ३०.० | ५६.० |
| केनिया | ३४.० | २३.३ | ४२.७ |
| न्यूझीलंड | ७.० | २७.४ | ६५.६ |
| रशिया फेडरेशन | ३.० | ४३.० | ५४.० |
| ताजिकिस्तान | २१.० | ३७.२ | ४१.८ |
| टांझानिया | २९.० | ३३.१ | ३७.९ |
| युगांडा | २४.० | २८.४ | ४७.६ |
| युनायटेड किंगडम | १.०० | २८.५ | ७०.५ |
| अमेरिकेची संयुक्त संस्थाने | १.०० | २१.६ | ७७.४ |

## हे नेहमी लक्षात ठेवा.

**चतुर्थक व पंचक आर्थिक व्यवसाय –**

तृतीयक आर्थिक व्यवसायांचा आणि त्यातील सेवांचा विचार करता या व्यवसायांच्या स्वरूपात खूप भिन्नता आहे. तसेच या सेवांच्या प्रकारांचा आवाकाही मोठा आहे. हा आवाका व भिन्नता लक्षात घेऊन सद्य:स्थितीत या सेवा चतुर्थक व पंचक व्यवसायात वर्गीकृत केल्या जातात.

ज्या व्यवसायांमध्ये चिंतन, संशोधन व नवनवीन कल्पनांचा विकास होत असतो अशा व्यवसायांना चतुर्थक व्यवसाय म्हणतात. यामध्ये शिक्षण, माहिती, संशोधन आणि विकास यांचा समावेश होतो. उदा. वित्त नियोजनकार, कर सल्लागार, संगणक प्रणाली विकासक, संख्याशास्त्री, शाळा, महाविद्यालय, विद्यापीठातील शिक्षक, लेखापाल, कलाकार, वैद्यकीय अधिकारी इत्यादी पेशांमधील व्यक्ती या वर्गात येतात.

व्यवस्थापन कौशल्य, वरिष्ठ कार्यकारी अधिकारी, सरकारी अधिकारी, संशोधन अधिकारी, न्यायाधीश इत्यादी व्यवसायांचा समावेश पंचक आर्थिक व्यवसायात होतो. चतुर्थक व्यवसाय व पंचक व्यवसाय यातील मुख्य फरक म्हणजे पंचक व्यवसायातील लोक उच्च स्तरीय निर्णय घेण्यात व नीती निर्धारण करण्यात गुंतलेले असतात.





## करून पहा.

आकृती ६.५ मधील नकाशात पाच काल्पनिक देशांची माहिती दिलेली आहे. नकाशा काळजीपूर्वक अभ्यासा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

- नकाशातील देशांमधील नैसर्गिक साधनसंपत्ती लक्षात घेता तेथे कोणते व्यवसाय भरभराटीस येतील ते सांगा.
- या व्यवसायातून उत्पन्न होणाऱ्या मालाची आयात-निर्यात कोणत्या देशांदरम्यान होईल ते शोधा.

- या व्यापारासाठी कोणकोणते तृतीयक व्यवसाय या देशांमध्ये निर्माण होतील ?
- देश 'इ' येथे सागरी किनारा नसल्यामुळे व्यापारावर काय फरक पडेल ?
- खालील देशांचा विचार करता, भौगोलिक घटकांचा मानवाच्या आर्थिक क्रियांवरील परिणाम थोडक्यात मांडा.




आकृती ६.५

## स्वाध्याय

**प्र.१. साखळी पूर्ण करा.**

| 'अ' | 'आ' | 'इ' |
|---|---|---|
| १. माथेरान | चहा | संदेशवहन |
| २. भौगोलिक स्थान निश्चिती | अटलांटिक महासागर | तृतीयक व्यवसाय |
| ३. श्रीलंका | कृत्रिम उपग्रह | निर्यात |
| ४. पनामा कालवा | पर्यटन | पॅसिफिक महासागर |

**प्र.२. योग्य पर्याय निवडा.**

१) तृतीयक व्यवसाय

अ. संसाधनांचा वापर

आ. पक्का माल

इ. कच्चा माल

ई. माल वाहतूक

२) नैसर्गिक बंदर

अ. कोची

आ. जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट

इ. दिल्ली इंटरनॅशनल कार्गो टर्मिनल

ई. नागपूर कार्गो हब (मिहान प्रकल्प)

३) ट्रान्स ऑस्ट्रेलियन लोहमार्ग स्थानक

अ. पर्थ-सिडनी

आ. पर्थ-व्लॉदिवोस्टोक

इ. सिडनी-व्हॅन्कुअर

ई. व्हॅन्कुअर-व्लॉदिवोस्टोक

**प्र.३. भौगोलिक कारणे लिहा.**

१) तृतीयक आर्थिक क्रियांमध्ये सेवा आणि विनिमय यांचा समावेश होतो.

२) हवाई वाहतुकीचे प्रमाण वाढत आहे.

३) भौगोलिक विविधता ही व्यापारास कारणीभूत असते.

**प्र.४. टिपा लिहा.**

१) संदेशवहनातील कृत्रिम उपग्रहांचे महत्त्व

२) व्यापारातील वाहतुकीची भूमिका

३) पर्यटन आणि राष्ट्राचे स्थूल उत्पादन

**प्र.५. फरक स्पष्ट करा.**

१) द्वितीयक व तृतीयक व्यवसाय

२) चतुर्थक व पंचक व्यवसाय

३) जलवाहतूक व हवाई वाहतूक

**प्र.६. सविस्तर उत्तरे लिहा.**

१) व्यापारावर परिणाम करणारे घटक कोणते ते स्पष्ट करा.

२) वाहतुकीचा विकास भौगोलिक घटकांवर अवलंबून असतो, स्पष्ट करा.

३) कोणत्याही देशाच्या विकासात वाहतूक व्यवस्थेचे स्थान का महत्त्वाचे असते?

४) संदेशवहन या तृतीयक व्यवसायाचा विस्तार आणि आवाका दिवसेंदिवस वाढत आहे, स्पष्ट करा.

**प्र.७. खालील माहिती नकाशात भरा व सूची द्या.**

१) सागरी वाहतुकीत क्रांतिकारक बदल करणारा एक कालवा

२) दोन खंडांदरम्यान वाहतूक करणारा लोहमार्ग

३) भारतातील एक आंतरराष्ट्रीय विमानतळ

४) भारतातील एक महत्त्वाचे बंदर

**प्र.८. उताऱ्यावरील प्रश्न**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासासाठी काळजीपूर्वक नियोजन आणि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. पर्यटन क्षेत्रात नियोजित विकासाची आवश्यकता खूप महत्वाची आहे. यात अनेक उद्योग जटिल मार्गाने एकत्र काम करीत आहेत आणि त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मूलभूतपणे नियोजन म्हणजे विविध प्रतिस्पर्ध्यांमधील उत्पादन, उत्पन्न आणि रोजगार जास्तीत जास्त वाढविण्याच्या दृष्टीने आणि विविध क्षेत्रांची योग्य वाढ होण्याचे सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने मर्यादित स्रोत वाटप करण्याचा प्रयत्न केला जातो. टूरिझम नियोजन ही अशी प्रक्रिया आहे, ज्याद्वारे निश्चित उद्दिष्टे साध्य करता येतील आणि पर्यटन विकासाकडे लक्ष दिले जाऊ शकते. पर्यटकांसाठी गंतव्यस्थान तयार करणे, श्रेणीसुधारित करणे आणि सुधारणे ही एक दीर्घकालीन आणि स्थिर प्रक्रिया आहे. समुदाय ही पर्यटनाची मूलभूत तत्त्वे आहेत. हे प्रामुख्याने स्थानिक समुदायांद्वारे दर्शविलेल्या स्वीकृतीच्या पातळीवर अवलंबून असते. प्रक्रियेत त्यांचा सहभाग आवश्यक आहे. पर्यटनाच्या विकासामुळे मुख्यत: पर्यावरणीय, सामाजिक-सांस्कृतिक आणि इतर कोणत्याही गंतव्यस्थानी यजमान समुदायाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो. हे परिणाम नकारात्मक तसेच सकारात्मक प्रभाव तयार करतात. गंतव्यस्थानाच्या शाश्वत विकासासाठी, नकारात्मक प्रभाव कमी करण्यासाठी आणि सकारात्मक परिणामास चालना देण्यासाठी नियोजन आवश्यक आहे.

१) पर्यटनक्षेत्राला नियोजनाची आवश्यकता का वाटते ?

२) नियोजनात समुदायांचे महत्त्व काय आहे ?

३) नियोजनाचे कोणतेही दोन फायदे सांगा

४) यजमान समुदायाच्या अर्थव्यवस्थेवर कोणत्या घटकांचा परिणाम होतो ?

५) नियोजन हे दीर्घकालीन कार्य का असते ?

***